MHLA050000282019

निमयती दिवाणी दावा क्र. ५/२०१९

**आदेश नि.क्र. ३० वर**

प्रतिवादी क्र. ३ ते ९ यांनी हा अर्ज दाखल करुन या प्रकरणी त्यांच्याविरूध्द वादीचा उलट तपास नाही असा झालेला आदेश रद्द करण्याची मागणी केली आहे.

२. या अर्जावर वादीने म्हणणे देऊन अर्जास तीव्र आक्षेप घेऊन अर्ज नामंजूर करण्याची मागणी केली आहे.

३. दोंन्ही बाजुच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादी क्र. ३ ते ९ च्या वकीलांचे म्हणणे असे की प्रतिवादींचे पुर्वीचे वकील आर.ए.जी.एस. पटेल हे सन २०२० मध्ये कारोना साथीमध्ये मयत झाले. त्यामुळे प्रतिवादी व त्यांचे वकील यांच्यात संपर्क झाला नसल्याने नवीन वकील नेमुन वादीचा उलटतपास घेता आला नाही. त्यामुळे त्यांच्याविरूध्द उलटतपास नाही असा आदेश झाला. वादीच्या वकीलांचे म्हणणे असे की अर्जात नमूद केलेले कारण संयुक्तिक नाही. प्रतिवादींना वेळोवेळी संधी देवूनही त्यांनी उलटतपास घेतला नसल्याने अर्ज नामंजूर करावा.

४. सदरचा दावा हा संपादन झालेल्या जमीनीच्या मोबदल्यापैकी रक्कम रू. १,४८,४००/– प्रतिवादींकडून वसूल होवून मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. या दाव्यात जमीनीच्या मालकीबाबत वाद निर्माण झालेला आहे. त्यामुळे सदरचा वाद गुणदोषावर निकाली काढणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.३ ते ९ यांना वादीचा उलटतपास घेण्याची संधी देणे न्यायोचित

होणार आहे. प्रतिवादींना अशी संधी दिल्यास वादीचे कसलेही नुकसान होणार नाही. म्हणून मी खालील आदेश देतो.

**आदेश**

नि. क्र. २७ वर प्रतिवादी क्र. ३ ते ९ विरुध्द वादीचा उलट तपास नाही हा झालेला आदेश रद्द केला आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by PRASAD ANANT SAVADIKAR
Date: 2023.06.27 10:50:15 +0530

(प्र. अ. सवदीकर)

दिनांक २६/०६/२०२३. दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपुर